# भूगोल विभाग अहवाल

भूगोल या विषयाचे व्यवहारीक महत्व लक्षात घेता हा विषय विद्यापीठ स्तरावर शिकवीला जातो. भूगोल हा विषय अनेक स्पर्धात्मक परिक्षेकरीता जसे यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. करीत अत्यंत महत्वपूर्ण आहे. तसेच आपण ज्या वातावरणात राहतो त्याच्या बद्दलचे कुतुहम नेहमीच आपल्याला राहीले आहे. पृथ्वीची निर्मीती, वातावरण, जलावरण, तापमानात होणारी वाढ, घटते पर्जन्य, लोकसंख्या वाढ, प्रदुषण अशा अनेक बाबी आपल्या रोजच्या जीवनात पाहायला मिळतात. त्याच अनुषंगाने हा विषय पदवी /बी.ए. च्या अभ्यासक्रमात अत्यंत महत्वपूर्ण आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्या अभ्यासक्रमानुसार सत्र २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षात बी.ए. भाग १ सेम-१ भुगोलशास्त्राची ओळख, सेम-२ हवामानशास्त्र ला भूरुपशास्त्र, बी.ए. भाग २ ला हवामानशास्त्र तर बी. ए. भाग ३ ला भारताचा भूगोल ह्या विषयाचे अक्ष्यापन करण्यात आले. भूगोल विषया अंतर्गत भूगोल अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून निखील पोहणकर तर सचिव म्हणून अमित ढोले यांची निवड करण्यात आली. सदर बैठकीला विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना मा. सौ. पुष्पा तायडे प्राचार्या. लोक महाविद्यालय, वर्धा यांनी मार्गदर्शन केले.

दि. १४ जानेवारी हा दिवस भूगोल दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यात विर्द्यार्थ्यांना पृथ्वीची निर्मीती व त्याचे आजचे बदलते स्वरूप या विषयावर एक ध्वनीचित्रफीत दाखवीण्यात आली. त्या अनुषंगाने प्रमुख पाहूने म्हणून उपस्थित डॉ. ईखार सर, राष्ट्रीय हुतात्मा महाविद्यालय, आष्टी यांनी मार्गदर्शन केले.

अभ्यासक्रमाचा भाग म्हणून बी.ए. भाग ३ च्या विद्यार्थ्यांना गावाचा सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करावयाचा असतो त्याअनुषंगाने आम्ही शेगाव या गावाची निवड केली. दि. १३ फेब्रुवारी २०१७ ला शेगाव या गावाला विद्यार्थ्यांना नेऊन तेथील ७० कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले व शेगाव हे धार्मिक व पर्यटनाच्या दृष्टीकोनातुन अत्यंत प्रसिध्द असे ठिकाण आहे. या गावातील लोकांचे व्यवसाय येथे असणाऱ्या श्री संत गजानन महाराज देवस्थान असल्याने मोठ्या प्रमाणात अवलंबुन आहेत.

वरिल सर्व उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे, लो.शि.प्र.मंडख चे मा. अध्यक्ष व सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

प्रा. पंकज दि. गोरडे

भूगोल विभाग प्रमुख

लोक महाविद्यालय, वर्धा